पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/९/कावि/ ९७८ /२०१०
दिनांक - ८ / ७ /२०१०

प्रति,

मा.............................................
सदस्य, महिला व बाल कल्याण समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा दिनांक १४/०७/१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १४/०७/१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत :- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - २

दिनांक :- १४/०७/१० वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक १४/०७/१० रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

अ) दिनांक ९/६/२०१० व १४/६/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ११ ) सभावृत्तांत कायम करणे.

ब) दिनांक ६/७/२०१० रोजी झालेल्या विशेष सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १ ) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक :- १) मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल) पुणे या संस्थेस ३१ मार्च २०१० पर्यंत अखेरच्या कालावधीकरीता प्रस्तावासोबत जोडलेल्या प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या प्रशिक्षणाचे जास्तीत जास्त ८०० लाभार्थी (प्रशिक्षणार्थी) या संख्येच्या मर्यादेत प्रशिक्षण योजना मनपाने निश्चित केलेल्या केंद्रामार्फतच प्रशिक्षण हे महिलांच्या मागणीनुसार व वेळेत राबविणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.
(दि.१४.०७.१० चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/९/कावि/ ९७८/२०१०
दिनांक :- ८ / ०७/२०१०

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाचे विषयपत्र (डॉकेट) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आले आहे.